Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

२५/२०२६

विषय : भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत...

संदर्भ : डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र. शिक्षण संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे-१६ यांचे क्र.उशिसं/ जीवन शैली बदलाबाबत/ मवि-१/२०२६/ई /६८५, दि. १३ मे २०२६ रोजीचे पत्र.

शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभाग,प्रशासकीय विभाग, सर्व संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था, संचालक, समन्वयक, प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांना उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून आदेशान्वये कळविण्यात येते की,उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपरोक्त संदर्भीय पत्राव्दारे,भारत देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी उददेशुन केलेल्या आवाहनानुसार सद्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी खालील मुद्याचे पालन करण्याचे आवाहन केले आहे,

१. सार्वजनिक वाहतुकीचा वापर: शक्य असेल तिथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.
२. इंधन व ऊर्जा बचत: पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. कार-पूलिंग (Car-pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.
३. परदेश दौरे व अनावश्यक खर्च: सध्याची परकीय चलन साठयाची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीचे किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.
४. महत्वाच्या/ अतिमहत्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतर बैठका: प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून (online Meeting) आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंगव्दारे घेण्यास प्राधान्य द्यावे.
५. स्वदेशीचा आग्रह: भारताची आयात व वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.
६. जीवनशैलीत बदल: स्थानिक पर्यटनाला (Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

तरी उपरोक्त प्रमाणे मा. पंतप्रधान महोदयांनी केलेल्या आवाहनाची गांभीर्याने दखल घेण्यात यावी व वरील नमुद सूचनांचे योग्यरित्या पालन होईल याची दक्षता घावी.आपल्या शैक्षणिक संकुलांमध्ये (Campuses) या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिम राबवून विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना या मोहिमेत सहभागी करुन घ्यावे व केलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सोबत :- उपरोक्त संदर्भीय पत्र
जावक क्रमांक आस्थापना / 666
दिनांक : 18 MAY 2026
प्रति,
१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक.
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय.
३) सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांचे प्राचार्य/ संचालक
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

विभाग प्रमुखांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणावे.

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्र. उशिसं/जीवन शैली बदलाबाबत/मवि-१/२०२६/ई /685 दि.१३.५.२०२६

13 MAY 2026

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषय: भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत.
संदर्भ: मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने केलेले आवाहन.

उपरोक्त विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी खालील मुद्द्यांचे पालन करणेबाबत आवाहन केले आहे.

1. सार्वजनिक वाहतुकीचा वापर: शक्य असेल तिथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.
2. इंधन व ऊर्जा बचत: पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. 'कार-पूलिंग' (Car-pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.
3. परदेश दौरे व अनावश्यक खर्च: सध्याची परकीय चलन साठ्याची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीचे किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.
4. महत्वाच्या/अतिमहत्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतर बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून (Online Meetings) आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यास प्राधान्य द्यावे.
5. स्वदेशीचा आग्रह: भारताची आयात व वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.
6. जीवनशैलीत बदल: स्थानिक पर्यटनाला (Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि उच्च शैक्षणिक संस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी. शैक्षणिक संकुलांमध्ये (Campuses) या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबवून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. तरी, आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना आणि विभागांना या संदर्भात तात्काळ सूचना निर्गमित कराव्यात आणि केलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६

प्रत माहितीसाठी सादर:
मा. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-32.
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-32.